Exh.16
Order
Seen.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.07.06 17:37:54 +0530

क्रि कि अर्ज नं 83/2026

मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो जयसिंगपूर
यांचे कोर्टात.

अरविंद जगन्नाथ कोडेसर - अर्जदार
विरुध्द
महाराष्ट्र सरकार - वि.प.

यातील अभियोग पक्षातर्फे म्हणणे असे की,

1) अर्जदार यांनी त्यांचे अर्जातील कलम 3 मधील अ.नं 1 ते 08 मधील विविध वित्तीय संस्था मधील कर्ज खाते खुले करून मिळणेबाबत मागणी केलेली आहे. सदर खातेशी गुन्हा रजि नं 75/2026 हा महा. सावकारी (नियमन) अधिनियम 2014 चे कलम 352, 351(2) प्रमाणे गुन्ह्याशी संबंधीत असलेचे दिसून येते.

2) सदर खातेशी ~~एकूण~~ गुन्ह्यातील एकूण 27 तोळे सोने व 150gm चांदीपैकी 9 तोळे सोने व 150gm चांदी असे मुल्यवान वस्तुचा समावेश असून सदर गुन्हा गंभीर स्वरुपाचा आहे.

3) सदर गुन्ह्यातील काही दागिने जप्त करणेत आले असून उर्वरित दागिने बाबात तपास करून जप्त करणेचे बाकि आहे.

4) यातील मुख्य आरोपी हा हा गुन्हा दाखल झालेपासून फरारी असून सदर अर्जदार हे त्याचे वडिल आहेत. आरोपी याने मौल्यवान वस्तू / दागिने तारण ठेवून कर्ज काढलेले असून सदर अर्जदार यांचे खातेवर यापैकी काही दागिने तारण ठेवून कर्ज काढलेले आहे त्याबाबत तपास बाकी आहे.

5) तसेच अर्जदार यांनी मुख्य आरोपी यांचेकडून दागिने घेवून तारण ठेवून कर्ज काढलेले आहे.

6) यातील अर्जदार यांनी तारण ठेवलेल्या दागिन्यांचे मालकी हक्काबाबत आज पर्यंत कोणतेही कागदपत्रे दिलेली नसलेने त्याबाबत तपास चालु आहे.

7) अर्जदार यांनी गुन्ह्यातील तारण घेतलेले दागिने हे त्यांचे विविध नमूद खात्यामध्ये तारण ठेवून बेकायदेशीर कर्ज काढलेली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

८) सदर अर्जदार यांचे कर्ज खातेतील दागिने हे फिर्यादी व अन्य लोकांकडून तारण घेतलेचे तपासी अधिकारी यांना निष्पन्न झालेले आहे.

९) सदर अर्जदार यांचे मागणीप्रमाणे कर्जखाते खुले केल्यास अर्जदार हे गैरवापर करून दागिने सोडवुन घेणेची व त्याची विल्हेवाट लावण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे त्याचे मुळ स्वरूपात बदल होवून भविष्यात ओळख निश्चितीचा प्रश्न उद्भवू शकतो.

तरी सदरचा अर्ज नामंजूर व्हावा ही विनंती

जयसिंगपूर

मे जा. ८८८८

(सह सरकारी अभियोक्ता)